नि..फौ.ख.क्र.६६९/२०२२
शासन वि.गणेश रमेशसिंह ठाकुर
नि.क्र.१७
**CNR :NO:MHBU06-002481-2022**

<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१</u>

मी शपथेवर खरे कथन करतो की,

नाव : रणजितसिंग सुरेशसिंग ठाकूर,

वय : ३३ वर्ष,

व्यवसाय : दुकान व्यवसाय,

राहणार : शेंगाव नाका, चांदमारी रोड, खामगांव, तालुका- खामगांव, जिल्हा- बुलढाणा.

सरतपास:

<u>सरतपास, सरकार तर्फे सरकारी वकील, श्री . ए. टी. कैथवास यांच्यातर्फे सुरू:</u>

मी, न्यायालयात हजर असलेल्या आरोपीला ओळखतो, तू माझा मोठा भाऊ आहे.घटनाहून दोन ते तीन वर्षे झालेले आहे. माझ्या आणि माझ्या मोठ्या भावामध्ये फक्त बोलचाल झाली होती, याव्यतिरिक काहीही घडले नव्हते. मला त्यावेळेस राग आला होता. मला राग आल्यामुळे मी पोलीस ठाण्यात रिपोर्ट देण्याकरिता गेलो होतो. आता, मला सरकारी वकिलांनी, मी दिलेला तोंडी रिपोर्ट दाखविला, त्यावर माझी सही आहे. परंतु त्यातील मजकूर मला मान्य नाही. तोंडी रिपोर्ट वरचे फिर्यादीच्या सहीला <u>निशाणी क्रमांक.१८</u> देण्यात येत आहे.आता, मला सरकारी वकिलांनी, मी दिलेला एफ.आय .आर दाखविला, त्यावर माझी सही आहे. परंतु त्यातील मजकूर मला मान्य नाही. एफ.आय.आर वरचे फिर्यादीच्या सहीला <u>निशाणी क्रमांक.१९</u> देण्यात येत आहे.पोलिसांनी माझा बयान नोंदवला नव्हता.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2025.11.04 16:29:50 +0530

नि..फौ.ख.क्र.६६९/२०२२
शासन वि.गणेश रमेशसिंह ठाकुर
नि.क्र.१७
**CNR :NO:MHBU06-002481-2022**

सरकारी वकिलांतर्फे  सरतपास पूर्ण:
सरकारी वकिलांनी उलटतपासाची परवानगी मागितली, त्यानुसार सरकारी वकिलांना भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये उलटतपासाची परवानगी देण्यात येत आहे.
उलटतपास सरकारी वकिलांतर्फे:

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ४.७.२०२२ रोजी दुपारी ४.३० वाजता मी, माझ्या घरून कामावर जाण्याकरिता निघालो होतो, त्यावेळेस आरोपीने माझ्या घरासमोर माझ्यासोबत वाद केला होता.हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला लोटपाट करून खाली पाडले होते. हे म्हणणे खरे नाही की,आरोपीने मला गालात, मानेवर चापट बुक्क्यांनी मारहाण केली होती.हे म्हणणे खरे नाही की,त्यामुळे माझ्या तोंडावर आणि टोकड्यावर मार लागले होते.हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस माझी आई आणि नाजुका ही आमचे मध्ये भांडण सोडवण्यासाठी आले होते.हे म्हणणे खरे नाही की,आरोपीने नाजुका हिच्या अंगावर काठी घेऊन मारण्यास गेला असता, मी ती काठी पकडल्याने माझ्या उजव्या हाताच्या बोटावर मार लागले होते.हे म्हणणे खरे नाही की,त्यावेळेस माझ्या आईने मला घराच्या आत नेले असता, आरोपीने घरावर वीट फेकली होती.हे म्हणणे खरे नाही की,आरोपीने मला व माझ्या आईला शिवीगाळ दिली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली होती.

३. आता मला सरकारी वकिलांनी माझ्या तोंडी रिपोर्ट मधला पोर्शन मार्क अ वाचून दाखविला, तो मी, पोलिसांना माझी तोंडी रिपोर्ट देता वेळेस सांगितला नव्हता. मला कारण सांगता येणार नाही की, पोलिसांनी माझ्या तोंडी रिपोर्ट मध्ये पोर्शन मार्क अ का नमूद केला.आता मला सरकारी वकिलांनी माझा बयान

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2025.11.04 16:30:14 +0530

नि..फौ.ख.क्र.६६९/२०२२
शासन वि.गणेश रमेशसिंह ठाकुर
नि.क्र.१७
**CNR :NO:MHBU06-002481-2022**

मधला पोर्शन मार्क ब वाचून दाखविला, तो मी, पोलिसांना माझा बयान देता वेळेस सांगितला नव्हता. मला कारण सांगता येणार नाही की, पोलिसांनी माझ्या बयान मध्ये पोर्शन मार्क ब का नमूद केला. हे म्हणणे बरोबर आहे की, आरोपी आणि मी सख्खे भाऊ आहे.हे म्हणणे बरोबर आहे की, आता आमचे संबंध चांगले आहे तसेच आमच्यातला वाद ही मिटलेला आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, मला यापुढे केस चालवायची नाही आणि साक्षी पुरावा घ्यायचे नाही.हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी आमचे वाद मिटलेले असल्यामुळे, मी, आरोपींना वाचवण्याकरिता आज रोजी खोटी साक्ष दिली.

सरकारी वकिलांतर्फे उलट तपास पूर्णण.
उलटतपास आरोपी तर्फे श्री .डी. के .माळवंदे वकिलांतर्फे: नाकारले
उलटतपास पूर्ण:
फेरतपास पूर्ण:

श्रवणोत्तर स्वीकृत

दि.०४/११/२०२५

Digitally signed by FARHANA TABASSUM SHAIKH
Date: 2025.11.04 16:30:24 +0530

(एफ.टा.शेख)
सह. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
खामगांव, जिल्हा- बुलढाणा.